खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### रोजगार मेळावा

पुढारी



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्याचे उद्‌घाटन करताना मान्यवर व विद्यार्थी.

## राजगुरू महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यात ७३ विद्यार्थ्यांना नोकरी

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि मॅजिक बस इंडिया फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे व चाकण परिसरातील कोटक महिंद्रा बँक, आयसीआयसीआय बँक, स्किल अकॅडेमी, पेटीएम, जस्ट डायल, वायएसएफ यशवंती फाउंडेशन, युवाशक्ती फाउंडेशन, जस्ट डाईल आणि क्वीझ क्रॉप आदी कंपन्यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात ७३ विद्यार्थ्यांची निवड झाली.

खेड तालुका व परिसरातील बेरोजगार युवकांना रोजगाराची नवीन संधी उपलब्ध व्हावी म्हणून या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर पुणे जिल्ह्यातील बारावी उत्तीर्ण, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या ३१६ तरुण-तरुणींनी नोंदणी केली. त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या व त्यातून ७३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

रोजगार मेळाव्याचे उद्घाटन संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक हिरामण सातकर पाटील, मॅजिक बस इंडिया फाउंडेशनचे प्रोजेक्ट मॅनेजर निखिल पवार, भूषण कुदळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या मेळाव्याचे आयोजन ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. अश्विनी तनपुरे यांनी केले.

My Gramin Edition
Sep 18, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**